पिंपरी येथील मे. दिवाणी न्यायाधिश साहेब वरि.स्तर यांचे कोर्टात.

रे. मु. नं. २/२०१५

१) श्रीमती सुधा रामचंद्र गोरी )
वय अं. ६० वर्षे, धंदा– काहीनाही )
रा. १०९५ सदाशिव पेठ, बाजीराव रोड )....वादी
सुशिला गणेश अपार्टमेंट, पुणे–४११०३०)

२) सौ. पुष्पा रामचंद्र कदम )
वय अं. ५८ वर्षे, धंदा– काहीनाही )
रा. प्लॉट नं. १९४, इंद्रप्रस्थ सोसायटी, )
मांजरी फाटा, हडपसर, पुणे–४११०२८ )

३) सौ. भारती सुभाष साठे, )
वय अं. ५४ वर्षे, धंदा– काहीनाही )
रा.चंद्राई बिल्डिंग, साठेवाडा,पिंपळे–निलख)
पुणे–४११०२७ )

४) कै. उमा शंकर खाटपे –मयत तर्फे वारस )

अ) श्री. अमित शंकर खाटपे )
वय अं.३० वर्षे, धंदा–नोकरी )
रा. स. नं. ८, अे–२०२, करण सेलेस्टा, )
बालेवाडी, पुणे–४११०४५

ब) सौ. पोर्णिमा पुष्कर मोरे )
वय अं. २८ वर्षे, धंदा– काहीनाही )... वादी.
रा. सदनिका क्र. १३, दुसरा मजला, )
श्रेयस सोसायटी, बिबवेवाडी.पुणे–४११०३७)

विरुध्द

१) श्री. देविदास बबनराव बहिरट )
वय अं. ५८ वर्षे, धंदा–शेती व व्यापार )
रा. सदनिका क्र. १६, चौथा मजला, )
सोनजाई अपार्टमेंट, फायनल प्लॉट नं. १०८)
प्रभात रोड गल्ली नं. १५, एरंडवणा, )
पुणे–४११००४ )

२) मेसर्स श्री सिध्दी विनायक डेव्हलपर्स )
भागीदारी संस्था कार्यालय एच.बी.२१/८ )...प्रतिवादी.
पिंपरी, पुणे–४११०१७ )
तर्फे भागीदार म्हणुन )
श्री. सतिश मोहनदास रोहरा )
वय अं. ५२ धंदा– बिल्डर )
रा. एच बी २१/८, पिंपरी, पुणे–१७ )

**दावा :– वाटपासाठी व ठराव, ताकीदीसाठी व खरेदीखत वादींचे हिश्यावर बंधनकारक नाही असा ठराव करुन मिळणेसाठी.**

सदरील वादी मे. कोर्टास नम्रपणे कळवितात ते येणेप्रमाणे :–

१) मिळकतीचे वर्णन :– तुकडी पुणे, पोट तुकडी तालुका हवेली मे. सब रजिस्ट्रार साहेब हवेली क्र. १ ते २० तसेच पिंपरी–चिंचवड महानगरपालिकेच्या हददीतील गांव मौजे रावेत येथील सर्व्हे नंबर १०१ हिस्सा नं. १ यांसी एकूण क्षेत्र ०४ हे. ४४ आर त्यासी आकार रुपये २०–४४ पैसे यापैकी ०२ हे.४४ आर यासी चतु:सिमा पुढीलप्रमाणे :–

पुर्वेस :– स. नं. १०१/१

दक्षिणेस :– स. नं. १४४

पश्चिमेस:– स. नं. १०२

उत्तरेस :– स. नं. १०० व ९९

येणेप्रमाणे चतु:सिमापूर्वक मिळकत त्यातील जल,तरु,तृण,काष्ट, पाषाण, इत्यादी निधीनिक्षेपादी सर्व तदंगभुत वस्तुसहीत, जाण्यायेण्याचे वहिवाटीचे, इजमेंटचे हक्कासह दरोबस्त मिळकत. वर नमुद केलेली मिळकत या प्रस्तुतच्या दाव्याचा विषय असून त्याचा येथून पुढे " वर कलम १ मध्ये वर्णन केलेली मिळकत " असा उल्लेख केलेला आहे.

२) वर कलम १ यात वर्णन केलेली मिळकत ही कै. यमुनाबाई तुकाराम बहिरट यांच्या वडिलोपार्जित मालकी हक्क व ताबे वहिवाटीची होती. त्याच्या निधनानंतर त्याच्या कायदेशीर वारसदाराकडे वारसा हक्काने आलेली आहे त्यांचा वंशवेल खालीलप्रमाणे :–

वंशवेल

कै. रखमाजी बाळा भोंडवे – मयत

यमुनाबाई तुकाराम बहिरट –मयत–मुलगी

लक्ष्मीबाई गेणुजी वाघेरे – मुलगी

बबनराव तुकाराम बहिरट – मयत

सौ. रुक्मीबाई बबनराव बहिरट –मयत–पत्नी

सुधा रामचंद्र जोरी, ( वादी नं.१ )

सौ. पुष्पा रामचंद्र कदम, (वादीनं.२)

सौ. भारती साठे, ( वादी नं.३ )

उमा खाटपे – मयत

देविदास बहिरट (प्रतिवादी नं.१)

अमित शंकर खाटपे ( वादी नं. ४अ )

पोर्णिमा पुष्कर मोरे ( वादी नं. ४ब )

३) वर कलम १ यामध्ये वर्णन केलेली मिळकत यमुनाबाई तुकाराम बहिरट यांचेकडे १/२ हिश्याने वारसा हक्काने आलेली होती. कै. यमुनाबाई तुकाराम बहिरट यांचे मृत्यूपश्चात त्यांचे कायदेशीर वारस श्री. बबनराव तुकाराम बहिरट ( मुलगा ) यांचेकडे वारसा हक्काने आलेली होती व श्री. बबनराव तुकाराम बहिरट यांचे मृत्यूनंतर त्याच्या कायदेशीर वारस मुली म्हणजेच श्रीमती सुधा रामचंद्र जोरी, सौ. पुष्पा रामचंद्र कदम, सौ. भारती सुभाष साठे, उमा शंकर खाटपे – मयत मुलगी तर्फे वारस मुलगा श्री. अमित शंकर खाटपे, २) मुलगी सौ. पोर्णिमा पुष्कर मोरे, श्री. देविदास बबनराव बहिरट ( मुलगा ) असे वारसदार आहेत.

३) वर कलम १ मध्ये वर्णन केलेली मिळकत वादी क्र. १ ते ३ यांच्या आजी कै. यमुनाबाई तुकाराम बहिरट व वादी क्र. ४ अ आणि ४ ब यांच्या पणजी यांची वडिलोपार्जित मालकी वहिवाटीची मिळकत होती व आहे. सदरची मिळकत ही कै. यमुनाबाई तुकाराम बहिरट यांना त्यांचे वडिल कै. रखमाजी बाळा भोंडवे यांच्याकडून वारसा हक्काने मिळालेली होती व आहे.

४) वादी क्र. १ ते ३ या प्रतिवादी क्र. १ यांच्या सख्या बहिणी असून वादी क्र. ४ अ व ४ ब हे प्रतिवादी क्र. १ यांची सख्खी बहिण –मयत उमा शंकर खाटपे यांचे वारस मुलगा व मुलगी आहेत. वर कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये वादीचा समान हक्क व हिस्सा आहे.

५) वर कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये वादींचा समान हक्क व हिस्सा असतानाही प्रतिवादी नं. १ म्हणजेच श्री. देविदास बबनराव बहिरट यांनी बेकायदेशीरपणे या वादीचा वर कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीमधील हक्क व अधिकार डावलून दावा मिळकतीवर ७/१२ च्या उताऱ्यावर खोटया व बनावट मृत्यूपत्राच्या आधारे प्रतिवादी नं. १ ने स्वतःचे नांव लावून घेतल्याचे प्रतिवादी नं. २ यांना दिनांक ७/५/२०११ रोजी करुन दिलेल्या खरेदीखत दस्त क्रमांक ४२७३/२०११ च्या दस्तावरुन स्पष्टपणे दिसून येत आहे. वादींनी जेव्हा वारसदार म्हणुन त्यांच्या नांवाची नोंद करणेकामी गांव कामगार तलाठी रावेत, ता. हवेली, जि. पुणे यांच्याकडे दिनांक २३/५/२०१४ रोजी अर्ज व प्रतिज्ञापत्र सादर

केले. तेव्हा या वादींना प्रतिवादी नं. १ यांनी प्रतिवादी नं. २ यांना सदरील मिळकत विक्री केल्याचे गांवकामगार तलाठी कार्यालयाकडून समजले. तेंव्हा वादींनी त्याच दिवशी म्हणजेच दिनांक २३/५/२०१४ रोजी मे. सब रजिस्ट्रार साहेब हवेली क्र. ५ पिंपरी–चिंचवड पुणे यांचे कार्यालयात खरेदीखत दस्त क्र. ४२७३/२०११ ची सर्टिफाईड नक्कल मिळणेसाठी वकिलामार्फत अर्ज दिला तेंव्हा वादींना सदरच्या खरेदीखताची नक्कल दिनांक ३०/५/२०१४ रोजी मिळाल्यानंतर प्रतिवादी नं. १ यांनी प्रतिवादी नं. २ यांना वर कलम १ यात वर्णन केलेल्या मिळकतीपैकी ८४ गुंठयाचे / आरचे खरेदीखत करुन दिले व सदरच्या खरेदीखताच्या दस्तामध्ये कलम २ मध्ये सदरची मिळकत ही प्रतिवादी नं. १ यांना कै. यमुनाबाई तुकाराम बहिरट यांच्या विलपत्राने आल्याचे नमुद केल्याचे वादींनी वाचल्यानंतर वादींना जबरदस्त धक्का बसला. कारण या वादींच्या आजी कै. यमुनाबाई तुकाराम बहिरट यांनी त्यांच्या हयातीत प्रतिवादी नं. १ यांच्या नांवे मृत्यूपत्र केल्याचे कधीही या वादींना सांगितले नव्हते व नांही.

६) वादीच्या आजी या सन १९९० ते २७/७/१९९८ या कालावधीमध्ये आजारी असल्यामुळे बिछान्यावर पडून होत्या त्यांना बोलता येत नव्हते, चालता येत नव्हते. अशा परिस्थितीत कै. यमुनाबाई तुकाराम बहिरट यांनी प्रतिवादी नं. १ यांच्या नांवे मृत्यूपत्र केले ही गोष्ट खोटी असल्याचे स्पष्टपणे दिसत आहे. सदरच्या मृतयूपत्राचा दस्त खोटा व बनावट दस्त प्रतिवादी नं. १ यांनी तयार

करुन या वादींचा वर कलम १ मध्ये वर्णन केलेल्या दावा मिळकतीमधील हक्क व अधिकार, हिस्सा हडप, गिळकृत करण्यासाठीं प्रतिवादी नं. १ यांनी सदरील तथाकथीत मृत्यूपत्राचा खोट व बनावट दस्त तयार केल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. कारण वादी नं. १ यांनी सदरच्या तथाकथीत मृत्यूपत्राचा दस्त खरेदीखत दस्त क्र. ४२७३/२०११ ला जोडला नाही किंवा सदरचा तथाकथीत दस्त कधी व कुठे नोंदवला त्याचा तपशिल सुध्दा खरेदीखतामध्ये नमुद केला नाही. केवळ वर कलम १ मध्ये वर्णन केलेल्या दावा मिळकतीमध्ये वादींचा असलेला हक्क व हिस्सा डावलण्याकरीता प्रतिवादी नं. १ यांनी सदरचा खोटा व बनावट मृत्यूपत्राचा दस्त तयार करुन वर कलम १ यामध्ये वर्णन केलेली दावा मिळकत एकट्यानेच गिळकृत करण्यासाठी सदरचा खटाटोप प्रतिवादी नं. १ यांनी केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे.

७) सदरील प्रतिवादी नं. २ यांनी सुध्दा प्रतिवादी नं. १ यांचेशी संगनमत करुन या सर्व वादींचा दावा मिळकतीमध्ये समान हक्क व हिस्सा असल्याची माहिती असतानाही या सर्व वादीची कुठल्याही प्रकारची सही, संमती न घेता दावा मिळकतीचे केलेले खरेदीखत बेकायदेशीर असल्यामुळे ते रदद् होण्यास पात्र आहे. तसेच या प्रतिवादींनी दावा मिळकतीचे खरेदीखताच्या दस्तावर या सर्व वादीची सही, संमती नसल्यामुळे सदरच्या दावा मिळकतीचे खरेदीखताचे दस्तावर या सर्व वादीच्या हिश्यावर बंधनकारक नाही.

८) या सर्व वादीचा दावा मिळकतीमध्ये असलेला समान व अविभकत हिस्सा वादींना मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादी नं. १ यांना व प्रतिवादी नं. २ यांना या सर्व वादीनी त्यांचे वकिलामार्फत दिनांक ४/१०/२०१४ रोजी नोटीस पाठवली. सदरची नोटीस दोन्ही प्रतिवादींनी न घेतल्यामुळे सदरची नोटीस परत वकिलांच्या पत्यावर पुन्हा परत आली.

९) सदरील वादीनी दावा मिळकतीचे समान व अविभक्त हिस्सा वेगळा व तुटक करुन वादीच्या ताब्यात देण्याची मागणी प्रतिवादी नं. १ याचेकडे केलेली होती व प्रतिवादी नं. २ यांनी प्रतिवादी नं. १ यांचेकडून दावा मिळकतीपैकी ८४ गुंठयाचे / आरचे केलेले खरेदीखत वादीच्या हिश्यापुरते रद्द करुन किंवा उलटवून वादींच्या नांवे दावा मिळकतीचे खरेदीखत करुन देण्याची मागणी प्रतिवादींना नोटीस वकिलामार्फत देवून केलेली होती. परंतू सदरील प्रतिवादींनी नोटीसीत नमुद केल्याप्रमाणे वर्तन न केल्यामुळे या वादींना या प्रतिवादीविरुध्द सदरचा दावा दाखल करणे भाग पडलेले आहे.

१०) सदरील वादीचा दावा मिळकतीमध्ये समान हक्क व हिस्सा असल्यामुळे सदरच्या दावा मिळकतीमध्ये सर्व वादींचा १/५ हिस्सा होता व आहे व त्याप्रमाणे दावा मिळकतीच्या वाटण्या व हिस्सा होणे गरजेचे आहे. तसेच दावा मिळकतीपैकी प्रतिवादी क्र. १ यांनी प्रतिवादी क्र. २ यांना दिनांक ७/५/२०११ रोजी तथाकथीत खरेदीखत दस्त क्र. ४२७३/२०११ जो खरेदीखताचा दस्त या सर्व वादींच्या सही संमतीशिवाय झालेले असल्यामुळे या सर्व वादींच्या

हिश्यावर बंधनकाकर नव्हते व नाहीत. सदरच्या तथाकथीत खरेदीखताच्या दस्ताची माहिती वादी दिनांक २३/५/२०१४ रोजी गांवकामगार तलाठी रावेत ता. हवेली, जि. पुणे यांचे कार्यालयामध्ये वारस नोंद करण्यासाठी गेले असता कथीत दस्ताबददलची माहिती मिळाली त्यामुळे सदरचा दस्त बेकायदेशीर असल्याने व वादी यांच्या सही, संमती शिवाय झालेला असल्यामुळे या सर्व वादीच्या हिश्यावर बंधनकारक नाही असा ठराव करुन सदरचे कथीत खरेदीखत रदद् करणे आवश्यक व जरुरीचे आहे. सदरचे खरेदीखत रदद् झाल्यास प्रतिवादी यांचे काहीएक नुकसान होणार नाही. सदरच्या कथीत खरेदीखताच्या आधारे प्रतिवादी यांनी या दाव्याचा निकाल लागेपर्यंत दावा मिळकत कोणासही कोणत्याही प्रकारे तबदिल करु नये म्हणुन तुर्ततुर्त कायमस्वरुपी मनाई देणे आवश्यक आहे. तशी मनाई दिल्यास प्रतिवादीचे काहीएक नुकसान होणार नाही या उलट प्रतिवादीच्या विरुध्द मनाईचा आदेश न केल्यास या वादीचे कधीही भरुन न येणारे नुकसान होणार आहे. सदरचे वादी यांचे बाजूने प्रथमदर्शनी केस असून बॅलन्स ऑफ कनव्हिनियन्स सुध्दा वादी यांचे बाजूने आहे.

११) दाव्यास कारण – सदरील वादी दिनांक २३/५/२०१४ रोजी गांव कामगार तलाठी रावेत , ता. हवेली, जि. पुणे यांच्या कार्यालयामध्ये वारस नोंद करण्यासाठी गेले असता दावा मिळकतीच्या खरेदीखताबाबत माहिती झाली तेंव्हा या वादींनी दिनांक २३/५/२०१४ रोजी खरेदीखताची प्रत मिळणेसाठी मे. सब

रजिस्ट्रार हवेली क्र. ५ पुणे यांच्या कार्यालयामध्ये वकिलामार्फत अर्ज दिला तेंव्हा या वादींना दिनांक ३०/५/२०१४ रोजी खरेदीखताची प्रत मिळाल्यावर प्रथम कारण घडले त्यानंतर वादीनी त्याचे वकिलामार्फत प्रतिवादीना दिनांक ४/१०/२०१४ रोजी नोटीस पाठविल्यावर घडले व त्यानंतर सदरची नोटीस दोन्ही प्रतिवादीनी न घेतल्यामुळे नोटीशीची पाकिटे वकिलांच्या घरच्या पत्यावर परत आली तेंव्हा घडले त्यानंतर रोजचे रोज घडत आहे.

१२) सदरचा दावा मुदतीत दाखल केलेला आहे.

१३) ज्युरिडिक्शन :– सदरची दावा मिळकत ही या मे. कोर्टाचे स्थलसिमेत येत असल्यामुळे व वादी व प्रतिवादी या मे. कोर्टाच्या स्थलसिमेत राहत असल्यामुळे सदरचा दावा चालविण्याचा हक्क व अधिकार या मे. कोर्टास आहे. सदरील वादी यांनी या दाव्या व्यतिरिक्त दावा मिळकतीबाबत कोठेही कसलाही दावा व क्लेम सरस निरस वाटणीसाठी व कब्जासाठी केलेला नव्हता व नाही. दावा मिळकतीबाबत वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये कोठेही दावा, वाद प्रलंबित नव्हता व नाही.

१४) सदरील वादी यांना दावा वाटप, ठराव ताकीदीकामी दाखल केलेला असून दावा मिळकत ही शेतजमीन असल्यामुळे व त्याचा एकत्रित शेतसारा रक्कम रुपये २०–४४ पैसे एवढा आहे. वादी यांनी ठरावाची व ताकिदीची मागणी केलेली असल्यामुळे दाव्याची आकारणी रक्कम रुपये १०००/– + १०००/– यावर केलेली आहे. दावा वाटपासाठी असल्यामुळे शेतसारा रक्कम रुपये २०.४४

पैसे च्या दोनशे पट एकूण रुपये ४०८८/— सदरचा दस्त हा वादीनी निष्पादीत केलेला नसल्यामुळे सदरचा दस्त या सर्व वादींच्या हिश्यावर बंधनकारक नसल्यामुळे तसा ठराव करुन मिळणेसाठी असल्याने ना सुप्रिम कोर्टाच्या सन २०१० च्या न्यायनिवाडयाप्रमाणे खरेदीखताच्या मोबदल्यावर स्टॅम्प देण्याची आवश्यकता नाही. सदरच्या दाव्याला बॉम्बे कोर्ट फी ॲक्टचे तरतुदीवरुन रुपये ६,०८८/— दाव्याची आकारणी करुन त्यावर कोर्ट फी स्टॅम्प फी रुपये ८६०/—एवढा दिलेला आहे.

१५) सदरील वादींना या दाव्यातील मजकूर वगळण्यास अगर दुरुस्त करणेस परवानगी असावी.

**१६) वादी तर्फे मे.कोर्टास नम्र विनंती की,**

अ) वादी यांचा दावा मंजूर करुन हुकूमनामा करण्यात यावा.

ब) दाव्यामध्ये वर्णन केलेला दस्त क्र. ४२७३/२०११ हा दस्त या वादीच्या हिश्यावर बंधनकारक नाही असा ठराव करण्यात यावा व तसा हुकूमनामा करण्यात यावा.

क) वादी नं. १ ते ४ अ, ४ ब यांचा दावा मिळकतीत १/५ अविभक्त हिस्सा आहे असा ठराव करण्यात येवून वादी नं. १ ते ४ अ, ४ ब याचा हिस्सा वेगळा व तुटक करुन स्वतंत्रपणे कब्जात देण्याचा हुकूम व्हावा.

ड) दाव्यातील मिळकत  शेत जमीन सरस निरस वाटणीसाठी सदरचा हुकूमनामा मा. जिल्हाधिकारी पुणे यांना सी. पी. सी. कलम ५४ प्रमाणे पाठविण्याचा आदेश व्हावा.

ई) सदरच्या दाव्याचा निकाल लागेपर्यंत दाव्यातील मिळकत कोणासही तबदिल करु नये म्हणुन अगर कोणत्याही प्रकारचे विकसन करु नये म्हणुन तुर्तातुर्त मनाई हुकूम प्रतिवादी यांचे विरुध्द देणेत यावा.

इ) या दाव्याचा खर्च प्रतिवादी यांचेकडून वादी यांना देण्याचा हुकूम व्हावा.

एफ) मे. कोर्टास वाटतील ते इतर योग्य व न्यायाचे हुकूम व्हावेत.

पिंपरी

दिनांक 07/१२/२०१४

वादी तर्फे ॲडव्होकेट

१) सौ. सुधा र. जोशी.

२) सौ. पुष्पा रामचंद्र कदम.

३) Mrs. B. S. Sathe

४–अ) A. S. Khatpe

४–ब) P. P. More

वादी.

// प्रतिज्ञालेख //

मी सौ. भारती सुभाष साठे, वय अं. ५४, धंदा–काहीनाही, रा. चंद्राई बिल्डिंग, साठेवाडा, पिंपळे–निलख, पुणे–४११०२७ सत्य प्रतिज्ञेवर कथन करते की, वरील दाव्यातील सर्व मजकुर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर असून त्यावर आज रोजी पिंपरी मुक्कामी सही केली असे.

पिंपरी

Mrs. B. S. Sathe

दिनांक २३/१२/२०१४ वादी नं. ३